महाराष्ट्र शासन

**Government Medical College & Hospital, Nandurbar**

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नंदुरबार.**

पत्ता : जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, साक्री रोड, नंदुरबार- 425412.

Website -htpp://gmchnandurbar.com E-Mail:- deangmchnandurbar@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.शावैमरुनं/मज्योजाआयो/जाहिरात/ ३१३२/२०२४ दिनांक:- १८ /०७/२०२४

# जाहिरात/कंत्राटी वैद्यकीय समन्वयक

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नंदुरबार या संस्थेत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत रुग्णसेवेच्या दृष्टीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर वर्ग-२ चे वैद्यकीय समन्वयक ०१ पद भरण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या स्थानिक निवड समिती मार्फत निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर (११ महिन्याकरिता) नियुक्ती करिता अर्ज सादर करण्याबाबत. अर्ज सादर करण्याची अंतिम तारिख २९/ ०७/२०२४ वेळ: सायंकाळी ५.०० वाजेपर्यत. सदर वेळेनंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी.

अर्ज सादर करण्याकरिता खालील प्रमाणे अटी व शर्ती देण्यात येत आहे.

**शैक्षणिक अर्हता :-**

१. M.B.B.S /B.H.M.S./B.A.M.S. पदवी परिक्षा उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रक तसेच पदवी परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र
२. संगणक परिक्षा (एमएससीआयटी) उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र
३. १० वी व १२ वी माध्यमिक व उच्च माध्यामिक शालांत परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र
४. शाळा सोडल्याचा दाखला/प्रमाणपत्र (टी.सी)
५. रहिवासी प्रमाणपत्र/आदीवास प्रमाणपत्र/जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र
६. शासकीय/निमशासकीय/खाजगी संस्थेत काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र

१.उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज प्रत्यक्ष येवुन योग्य त-हेने भरलेले अर्ज आवश्यक खालील दिलेल्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतीसह अर्जासोबत खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करावेत.

२.सदरील पदासाठी वयोमर्यादा व इतर अटी शर्ती तसेच आरक्षणा संदर्भात महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे लागु राहील.

**वेतन**:-महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत मंजुर असलेल्या अनुदानामधुन सदर खर्च भागविण्यात येईल. सदर एम.बी.बी.एस.पदाचेमासिक वेतन (up toरुपये ४०,०००/-) व बी.एच.एम. अथवा बी.ए.एम.एस. असल्यास रुपये ३०,०००/- ते ३५,०००/- असे राहील

**निवड**:- शासकीय/निमशासकी/खाजगी संस्थेत काम केलेले असल्यास प्रथम प्राधान्य राहील. प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार विहीत निकष ठरवून शैक्षणिक कागदपत्रे छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुलाखतीकरिता बोलवण्यात येईल. मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. मुलाखतीकरिता निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची यादी दिनांक १०/०७/२०२४ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नंदुरबार यांचे नोटीसबोर्डवर लावण्यात येईल. निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची मुलाखत घेवून उत्तीर्ण उमेदवारांची गुणानुक्रमे निवड/प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारास ११ महिन्यांकरिता नियुक्ती देण्यात येईल काम समाधानकारक असल्यानंतरच कालावधी वाढविण्यात येईल.

**जाहिरातीमधील मजकुरात बदल करण्याबाबत** :- सदर जाहिरातीमधील कोणत्याही मजकुरात बदल करण्याबाबत उदा. अटी/नियम /निवड/पद भरणे अथवा रद्द करणे/पद भरती संख्या/जाहिरात रद्द करणे इ. अधिकार मा.अधिष्ठाता यांनी राखुन ठेवण्यात आले आहे.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
रुग्णालय, नंदुरबार

प्रति,

१.सुचना फलक , शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णाल, नंदुरबार
२.वैद्यकीय समन्वयक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,नंदुरबार